## सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन

दिनांक : / /२०२४.

परिशिष्ठ अ

प्रती,

मा. सहायक संस्था निबंधक,

विभाग पुणे.

विषय : संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी बाबत.

संस्थेचे नाव : सावित्रीबाई फुले पुणे यूनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन

कार्यालयाचा पत्ता : प्रा. सतीश परदेशी. - ५, भाग्यलक्ष्मी, पल्लवी को-ऑप हाऊसिंग सोसायटी, सेनापती बापट रोड, शिवाजी नगर, मॉडेल कॉलॉनी, पुणे. महाराष्ट्र. ४११०१६.

महोदय,

निवेदन करण्यात येते की, विषयात नमूद केलेल्या संस्थेची नोंदणी संस्था अधिनियम १८६० प्रमाणे करायची आहे. सबब आपणाकडे खालील प्रमाणे कागदपत्र सादर करण्यात येत आहेत.

१. विधानपत्र (ज्ञापन) (मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन)
२. नियम व नियमावली सत्यप्रत
३. संस्था नोंदणी संदर्भात कार्यकारी मंडळाचे सर्व सभासदांची संमतीपत्रे
४. संस्था नोंदणी बाबत कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांच्या सहीनीशी अधिकारपत्र
५. संस्थेच्या पत्त्याबाबत व मालमत्तेबाबत अध्यक्ष यांचे प्रतिज्ञापत्र
६. अनुसूची एक (नियम ७)
७. अनुसूची दोन ( नियम ८)
८. अनुसूची एक (नियम ११)
९. संमतिपत्र (११५०)
१०. संस्थेच्या स्थापनेबाबत ठरावाची सत्यप्रत

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| सतीश परदेशी | दीपक गरुड | राजू गच्चे |

SPPUTA

११. हमीपत्र

१२. प्रथम कार्यकारिणीची यादी

१३. संस्थेच्या पत्त्याबाबत जागा मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र

१४. सर्व सभासदांचे ओळखपत्र व पत्त्याचा पुरावा

पुढे असेही निवेदन करण्यात येते की, वरील सर्व उद्देश सन १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमच्या कलम २० क अन्वये असून वरील संस्थेच्या नावाची वा नाव सादृश्य असलेली अन्य संस्था माझे माहितीप्रमाणे अस्तित्वात नाही. नोंदणी शुल्क रुपये ५०/- (रुपये पन्नास फक्त) भरण्यास आम्ही तयार आहोत. तरी वरील संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये त्वरीत नोंदवावी अशी विनंती आहे.

आपला विश्वासू,

SPPUTA

सतीश परदेशी

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| सतीश परदेशी | दीपक गरुड | राजू गच्चे |

परिशिष्ट ब

"सावित्रीबाई फुले पुणे यूनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन"

१. संस्थेचे नाव : सदर संस्थेचे नाव "सावित्रीबाई फुले पुणे यूनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन" असे राहील व याच नावाने संबोधले जाईल.

२. सदर संस्थेचा कार्यालयीन पत्रव्यवहाराचा पत्ता पुढील प्रमाणे राहील.

प्रा. सतीश परदेशी. - ५, भाग्यलक्ष्मी, पल्लवी को-ऑप हाऊसिंग सोसायटी,
सेनापति बापट रोड, शिवाजी नगर, मॉडेल कॉलॉनी, पुणे. महाराष्ट्र. ४११०१६.

३. संस्थेचे उद्देश :

A. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिसरातील सर्व प्रवर्गातील प्राध्यापकांना संघटित करणे, त्यांना एकत्रित करणे आणि त्यांचे विद्यापीठातील अधिकाऱ्यांशी असलेले संबंध नियमित करणे.

B. सदस्यांना त्यांच्या जीवनमानात आणि सेवेत सुस्थिती प्राप्त करून देणे.

C. त्यांच्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न करणे.

D. वेतन कपातीला प्रतिबंध करण्याचा आणि परिस्थितीनुसार शक्य झाल्यास आगाऊ रक्कम मिळवून देण्याचा प्रयत्न करणे.

E. कामातील खंड टाळता यावा म्हणून प्राध्यापक आणि विद्यापीठातील अधिकारी यांच्यातील तंट्यात सलोख्याने तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न करणे.

F. बेकारी, विकलता, वार्धक्य आणि मृत्यू याबाबत ज्या काही तरतुदी आहेत त्यांची अंमलबजावणी करण्यास सांगणे.

G. प्राध्यापकांचे काही नुकसान झाल्यास नियमाप्रमाणे भरपाई मिळवून देण्याचा प्रयत्न करणे.

H. सेवेदरम्यान किंवा तदनुषंगाने उद्भवणाऱ्या बाबींमध्ये सदस्यांना निधी सहाय्य देणे.

I. असोसिएशनच्या मंजुरीने पुकारलेल्या संपाच्या काळात किंवा बेमुदत बंदच्या काळात सदस्यांना मदत देण्याचा प्रयत्न करणे.

J. विद्यापीठ व विद्यापीठाबाहेरील विशेषत: सारखीच उद्दिष्टे असलेल्या प्राध्यापक संघटनांना सहकार्य करणे.

K. भारतातील व भारताबाहेरील विद्यापीठे व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिसरातील प्राध्यापक संघटनांना सहकार्य करणे.

L. 'एलिट' क्लबची स्थापना करून विविध विषयावर चर्चा घडवून विद्यापीठ प्रशासन व सरकारला सूचित करणे.

M. या नियमात उल्लेखलेल्या उद्दिष्टांच्या प्रचलनासाठी असोसिएशनच्या अधिनियमानुसार विद्यापीठ व विद्यापीठाबाहेरील प्राध्यापक वर्गाला मदत करणे.

N. साधारणपणे सदस्यांची सामाजिक, आर्थिक, नागरी, आणि राजकीय स्थिति सुधारण्याकरता आवश्यक असे इतर उपाय योजणे.

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| सतीश परदेशी | दीपक गरुड | राजू गच्चे |

SPUTA

"सावित्रीबाई फुले पुणे यूनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन" या संस्थेच्या नियम व नियमावली प्रमाणे ज्यांचेवर संस्थेच्या व्यवस्थापनेची जबाबदारी विहित केली आहे, आशा पहिल्या कार्यकारी मंडळातील सभासदांची नावे, संस्थेतील पद ई...

| अ.क्र. | संभासदाचे नाव | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व | पद |
|---|---|---|---|---|---|
| १ | सतीश कृष्णनाथ परदेशी | ५५ | नोकरी | भारतीय | अध्यक्ष |
| २ | नवनाथ भागचंद तुपे | ५५ | नोकरी | भारतीय | उपाध्यक्ष |
| ३ | दीपक सूर्यकांत गरुड | ५२ | नोकरी | भारतीय | सचिव |
| ४ | श्रद्धा नीलेश कुंभोजकर | ५२ | नोकरी | भारतीय | सहसचिव |
| ५ | राजू निवृत्ती गच्चे | ५३ | नोकरी | भारतीय | कोषाध्यक्ष |
| ६ | विकास लक्ष्मण मठे | ४६ | नोकरी | भारतीय | कोषाध्यक्ष |
| ७ | राजेंद्र साळूबा म्हस्के | ५५ | नोकरी | भारतीय | सदस्य |
| ८ | वर्षा वासुदेवराव वानखडे | ४८ | नोकरी | भारतीय | सदस्य |
| ९ | आशीष नामदेव डोंगरे | ४४ | नोकरी | भारतीय | सदस्य |
| १० | राजेंद्र सोमा घोडे | ३९ | नोकरी | भारतीय | सदस्य |
| ११ | तलअत प्रवीण | ४६ | नोकरी | भारतीय | सदस्य |

SPUTA

आम्ही खालील सह्या करणार जाहीर करतो की, सावित्रीबाई फुले पुणे यूनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही "सावित्रीबाई फुले पुणे यूनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन" ही संस्था आज दिनांक / /२०२४. स्थापन केली असून ती संस्था अधिनियम १८६० क अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या ज्ञापनावर सह्या करीत आहोत.

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| सतीश परदेशी | दीपक गरुड | राजू गच्चे |

| अ. क्र. | सभासदाचे नाव | सही |
| --- | --- | --- |
| १ | सतीश कृष्णनाथ परदेशी | |
| २ | नवनाथ भागचंद तुपे | |
| ३ | दीपक सूर्यकांत गरुड | |
| ४ | श्रद्धा नीलेश कुंभोजकर | |
| ५ | राजू निवृत्ती गच्चे | |
| ६ | विकास लक्ष्मण मठे | |
| ७ | राजेंद्र साळूबा म्हस्के | |
| ८ | वर्षा वासुदेवराव वानखडे | |
| ९ | आशीष नामदेव डोंगरे | |
| १० | राजेंद्र सोमा घोडे | |
| ११ | तलअत प्रवीण | |

SPPUTA

ठिकाण : पुणे

दिनांक :   /   /२०२४.

वरील सर्व इसमांना मी ओळखत असून त्यांनी माझ्या समक्ष सह्या केल्या व त्यांना मी ओळखतो.

अध्यक्ष<br>सतीश परदेशी

सचिव<br>दीपक गरुड

खजिनदार<br>राजू गच्चे

## प्रतिज्ञा पत्र

असे प्रमाणपत्र देण्यात येते की, आमचे माहितीप्रमाणे "सावित्रीबाई फुले पुणे यूनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन" या नावाची संस्था अथवा नावात साम्य असणारी दुसरी संस्था या शहरात / गावात १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमानुसार नोंदणी झालेली व अस्तित्वात नाही.

SPPUTA

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
| सतीश परदेशी | दीपक गरुड | राजू गच्चे |

परिशिष्ट क

"सावित्रीबाई फुले पुणे यूनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन"

द्वारा, प्रा. सतीश परदेशी, - ५, भाग्यलक्ष्मी, पल्लवी को-ऑप हाऊसिंग सोसायटी, सेनापति बापट रोड, शिवाजी नगर, मॉडेल कॉलॉनी पुणे. महाराष्ट्र. ४११०१६.

<u>नियम व नियमावली</u>

१. <u>नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या</u> :

अ. <u>संस्था</u> : संस्था नोंदणी अधिनियम मुं. सा. वि. व्य. महाराष्ट्र १८६० अन्वये नोंदविण्यात येणारी संस्था.

आ. <u>नियम</u> : संस्था नोंदणी अधिनियम मुं. सा. वि. व्य. महाराष्ट्र १८६० कायदे व संस्था नोंदविण्यात येतांना कार्यकारी मंडळाने तयार केलेले नियम व नियमावली.

इ. <u>कार्यकारी मंडळ</u> : संस्थेचे कार्यकारी मंडळ म्हणजे संस्थेच्या नियम व नियमावलीनुसार संस्था स्थापनेच्या वेळी व नंतर संस्थेच्या सर्वसाधारण सभेत निवडून येणारे मंडळ किंवा विश्वस्त की, ज्यांचेवर संस्थेची जबाबदारी व व्यवस्था सोपवली असे मंडळ अशा कार्यकारी मंडळात अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, खजिनदार व सदस्य आवश्यक असल्यास इतर पदे प्रामुख्याने असतील.

ई. <u>सभासद</u> : संस्थेचे नियम व नियमावली मान्य असणारी कार्यकारी मंडळाने प्रवेश दिलेली अजीवन सदस्य आणि नियमीतपणे वर्गणी भरणारी भारतीय व्यक्ति संस्थेची सभासद म्हणून संबोधण्यात येईल.

उ. <u>अनुसूची</u> : या नियमावली सोबत जोडलेल्या स्वतंत्र अशा अनुसूची १, २, ६ की, ज्या सन १९७१ च्या संस्था नोंदणी महाराष्ट्राचे नियमाप्रमाणे आहेत.

ऊ. <u>उद्देश</u> : ज्ञापन पत्रात नमूद केलेले उद्देश की, ज्या करता स्थापन करण्यात येत आहे असे उद्देश.

२. <u>कार्यक्षेत्र</u> : संस्थेचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्र असे राहील.

३. <u>या संस्थेचे हिशोबाचे वर्ष हे १ एप्रिल ते ३१ मार्च अखेर, असे राहील.</u>

४. <u>सभासदत्व व त्याची नोंदणीची पद्धत</u> :

विद्यापीठातील प्राध्यापकांना सभासद करून घेते वेळेस त्यांनी वार्षिक रक्कम रुपये पाचशे फक्त फी भरून सामान्य सभासद होता येईल. संस्थेने ठरविलेल्या नमून्याप्रमाणेच अर्ज करावे लागतील. कार्यकारी मंडळाने त्या अर्जाचा स्वीकार केल्या नंतरच त्यांना सभासदत्व मिळू शकेल, या बाबत कार्यकारी मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| सतीश परदेशी | दीपक गरुड | राजू गच्चे |

५. सभासदांचे प्रकार :

सभासदांचे प्रकार खालील प्रमाणे राहतील.

अ. आजीव सभासद : जी व्यक्ति एकदम रुपये पाचशे वर्गणी देईल त्या व्यक्तीस आजीव सभासदत्व देण्यात येईल.

आ. हितचिंतक सभासद : संस्थेचे कामकाज व योजनेचे विस्ताराचे दृष्टीने रुपये पाचशे किंवा त्या पेक्षा जास्त वर्गणी देणारी व्यक्ति ही हितचिंतक सभासद होईल.

६. सभासद रद्द होणे :

अ. पुढील एक किंवा अनेक कारणांनी सभासदत्व रद्द करून संस्थेत सभासद म्हणून राहता येणार नाही. ते जर संस्थेचे व्यवहारात किंवा संस्थेचे कारभारात व्यत्यय किंवा बाधा आणीत आहे असे वर्तन केल्यास / वागल्यास.

आ. त्यांनी नैतिक गुन्हा केल्यास आणि त्यांना शिक्षा झाल्यास.

इ. ते मृत्यू पावले, कायमचे अपंगत्व आले तर किंवा त्यांनी संस्थेतील सभासदत्वचा राजीनामा दिला.

ई. संस्थेचे उद्देशास बाधा आणल्यास किंवा बाधा आणीत आहे असे संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे निदर्शनास आल्यास किंवा बाधा आणण्याचा प्रयत्न केल्यास.

उ. जर संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सभेत गैरवर्तन केल्यास किंवा संस्थेचे कार्यकारी मंडळाने आयोजित केलेल्या सभेत गैरवर्तनाबद्दल बहुमताने ठराव केल्यास किंवा रद्द ठरविल्यास.

७. सर्वसाधारण सभा व तिची कार्ये आणि अधिकार :

या संस्थेची सर्वसाधारण सभा ही दर वर्षी एकदा घेण्यात येईल. या सभेत पुढील प्रमाणे कामे केली जातील.

अ. मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखवणे.

आ. अध्यक्षांच्या सूचनेवरून इतर कामकाज करणे.

इ. मागील सभेत घेतलेल्या निर्णयांची अमलबजावणी करणे.

ई. संस्थेला आलेल्या देणग्यांचा व वर्गानीचा हिशोब ठेवणे. त्यांच्या पावत्या देणे.

उ. सर्वसाधारण सभा बोलावून निवडणूक घेणे.

८. सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या :

सर्वसाधारण सभेची सूचना सभेच्या दिनांकापूर्वी पंधरा दिवस अगोदर नोटिस बोर्डावर लावली पाहिजे. अथवा सभासदांच्या घरी सभेपूर्वी चार दिवस अगोदर गेली पाहिजे. अथवा ईमेल व व्हॉटसअॅप समूहावर नोटिस पाठवण्यात येईल. या सूचनेत विषय, सभेचे ठिकाण, तारीख ई... चा उल्लेख करणे आवश्यक आहे.

सभेची गणसंख्या एकूण सभासदांच्या तीनपंचमांश इतकी राहील. ठरलेल्या वेळेत गणपूर्ती झाली नसल्यास सभा त्याच ठिकाणी त्याच विषयावर अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. त्यास गणपूर्तीची आवश्यकता नाही. त्यामुळे सभा वैध ठरवण्यात येईल.

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| सतीश परदेशी | दीपक गरुड | राजू गच्चे |



SPPUTA

९. विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये :

कारणांव्यतिरिक्त कार्यकारी मंडळ अशी सभा बोलावू शकतील. कमीत कमी दोनतृतीयांश सभासदांच्या लेखी मागणीवरून तातडीची किंवा विशिष्ठ कामासाठी सभा घेण्यात येईल. अशा सभेच्या मागणीत कारण, विषयाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. या सभेचा निर्णय परिपत्रकान्वये ठरवीता येईल. असा निर्णय बिनविरोध झाला पाहिजे. अशा परिपत्रकास विरोध केला गेला तर तो विषय नियमित सभेत चर्चेला घेवून त्यावर बहुमताने निर्णय घेतला जाईल.

१०. संस्थेचे कार्यकारी मंडळ व तिचे पदाधिकारी यांची रचना :

या संस्थेचे व योग्य व्यवस्थापनाच्या कारभाराचे हिताचे दृष्टीने व व्यवस्थित कारभाराचे कार्य पद्धतीसाठी संस्थेच्या सामान्य व आजीव सभासदांकडून दर पाच वर्षांनी कार्यकारी मंडळाची निवडणूक पद्धतीने निवड, वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये करण्यात येईल. कार्यकारी मंडळ कमीत कमी तेरा लोकांचे व जास्तीत जास्त एकवीस लोकांचे राहील.

११. तिचे पदाधिकारी :

A. अध्यक्ष, B. उपाध्यक्ष, C. सचिव, D. सहसचिव, E. खजिनदार, F. कार्यकारी सदस्य, असे पदाधिकारी राहतील.

१२. कार्यकारी मंडळाची व निवडणुकीची पद्धत :

कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ पाच वर्षांपर्यंत राहील. कार्यकारी मंडळाची निवडणूक पाच वर्षांनी होवून, तिचे मतदान गुप्त पद्धतीने घेवून मंडळ स्थापन करता येईल.

१३. कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :

या संस्थेचे कार्यकारी मंडळ त्यांचेतून पाच वर्षाने खालील पदाधिकारी यांची बहुमताने निवड करतील आणि त्यांचे कार्य व अधिकार पुढील प्रमाणे राहतील.

A. अध्यक्ष :

अ. सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारून सभेचे संचलन करणे.

आ. संस्थेचे मालमत्तेवर व एकूण कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

इ. पैशाची देवाण, घेवाण करणे व कागदपत्रांवर सह्या करणे.

ई. आवश्यक वाटल्यास सभेची सूचना देवून सभा आयोजित करणे.

उ. समान मत विभागणी झाल्यास निर्णयाचे ज्यादा मत देणे.

ऊ. कार्यकारी मंडळास संस्थेच्या कामात मार्गदर्शन व मदत करणे.

B. उपाध्यक्ष :

अ. अध्यक्षांच्या गैरहजेरीत त्यांची कामे पाहणे.

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| सतीश परदेशी | दीपक गरुड | राजू गच्चे |

SPPUTA

C. सचिव :

अ. संस्थेचा पत्रव्यवहार करणे व दैनंदिन कामकाज पाहणे.

आ. सभेची सूचना काढून सभेचे आयोजन करणे व सभा वृतान्त लिहिणे.

इ. पैशांची देवाण, घेवाण करणे व संस्थेचे आर्थिक व्यवहार पाहणे.

ई. संस्थेच्या उद्देश पूर्तीकरीता प्रयत्नशील राहणे.

उ. संस्थेच्या मालमत्तेवर व कारभारावर नियंत्रण ठेवणे.

ऊ. वार्षिक अहवाल तयार करणे. संस्थेचे सर्व प्रकारचे दप्तर ठेवणे व सांभाळणे.

ऋ. कार्यकारी मंडळाच्या होणाऱ्या सभेतील ठरावांची अमलबजावणी करणे.

ऌ. तक्रारींचे निवारण करणे व कायदेशीर प्रतिनिधि म्हणून काम पाहणे.

ऍ. संस्थेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक ती कोर्ट कचेरीची कामे पाहणे.

ऐ. संस्थेच्या कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवणे व त्यांचेकडून कामे करून घेणे.

ए. हिशोब पाहून त्यावर सह्या करणे व खर्चाची बिले मंजूर करणे.

ऐ. किरकोळ नियम तयार करणे.

ऑ. संस्थेची सर्व कागदपत्रे, हिशोब पुस्तके सचिवांच्या ताब्यात राहतील व प्रत्येक सभासदाला ते पाहण्यासाठी मुभा राहील.

D. सहसचिव :

अ. सचिवांच्या गैरहजेरीत त्यांचे कामकाज पाहणे, तसेच त्यांना संस्थेच्या दैनंदिन कामकाजाबाबत मदत करणे.

E. खजिनदार :

अ. संस्थेचे सर्व हिशोब लिहिणे व कार्यकारी मंडळापुढे ठेवणे.

आ. राजकीर्द, खतावणी, पावतीपुस्तके, व्हाउचर्स, फाईल ठेवणे.

इ. संस्थेच्या आर्थिक व्यवहारावर लक्ष ठेवणे.

ई. वार्षिक जमाखर्च तयार करून त्याचे ऑडीट करून घेणे.

उ. पैशांची देवाण, घेवाण करणे.

F. कार्यकारी सदस्य :

अ. सभेला हजर रहाणे.

आ. मतदान करणे.

इ. संस्थेच्या कामकाजात मदत करणे, संस्थेच्या उपयोगी असलेली कामे करणे.

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| सतीश परदेशी | दीपक गरुड | राजू गच्चे |

SPPUTA

१४. कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :

कार्यकारी मंडळाची सभा प्रत्येक तीन महिन्यातून एकदा बोलावली जाईल. त्या सभेला नियमित सभा समजणेत येईल, परंतु कारणा व्यतिरिक्त कार्यकारी मंडळ ज्यादा सभा बोलावू शकतील. या सभेस विशेष सभा समजली जाईल. कमीतकमी तीन व्यक्तींच्या लेखी मागणीवरून तातडीच्या किंवा विशिष्ठ कामासाठी सभा घेण्यात येईल. अशा सभेचे मागणीत कारण विषयाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

१५. कार्यकारी मंडळाचे सभेची सूचना व गणसंख्या :

कार्यकारी मंडळाच्या सभेची पूर्व सूचना कमीत कमी सात दिवस आधी द्यावी. अशा स्वरूपाची सूचना सर्वांना देणे आवश्यक राहील. या सुचनेत विषय, सभेचे ठिकाण, वेळ, तारखेचा उल्लेख करणे आवश्यक राहील. ठरलेल्या वेळेत तीनपंचमांश गणसंख्या पूर्ती झाली नाही तर ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासापर्यंत गणपूर्ती न झाल्यास निश्चित दिवशी व वेळी सभा पुढे घेण्यात येईल. त्यावेळी तीनपंचमांश गणपूर्तीची आवश्यकता नाही.

१६. कार्यकारी मंडळाचे निवडणुकीचे नियम :

कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ पाच वर्षांपर्यंत राहील. निवडणूक दर पाच वर्षांनी होवून तिचे मतदान गुप्त पद्धतीने होवून मंडळ स्थापन करणे.

१७. कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत :

मृत्यू, राजीनामा अगर अन्य कारणाने रिकाम्या झालेल्या जागी कार्यकारी मंडळाचे बहुमताने नवीन पदाधिकारी नेमण्याचे अधिकार संस्थेचे कार्यकारी मंडळास राहील. मा. सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे त्याबाबतचा बदल अर्ज मान्यतेस्तव दाखल केला जाईल.

१८. कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :

अ. उद्देश पूर्तीसाठी करावी लागणारी कामे करणे, संस्थेच्या इतर नोकर वर्गाकडून ती करवून घेणे.

आ. निधी, देणग्या, वर्गण्या, गोळा करणे व त्यांच्या पावत्या देणे.

इ. अध्यक्ष, सचिव, खजिनदार यांच्या सहीने निधीचा विनियोग योग्य पद्धतीने करणे.

ई. ध्येय, धोरण, उद्देश साध्य करण्यासाठी निरनिराळ्या योजना आखणे. त्या योजना अमलात येतील असे पाहणे.

उ. संस्थेच्या नियमात बदल सुचविणे.

ऊ. उद्देश पूर्तीचे अगर संस्थेचे हितास बाधा न आणण्याकडे लक्ष पुरविणे.

१९. संस्थेचा निधी, मिळकत व विनियोग :

संस्थेच्या नियमाप्रमाणे निधी गोळा करुन त्याचा विनियोग उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी केला जाईल.

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| सतीश परदेशी | दीपक गरुड | राजू गच्चे |

२०. उद्दिष्टनिहाय खर्चाची तरतूद (टक्केवारी प्रमाणे) :

संस्थेच्या उद्देश पूर्तीसाठी संस्थेच्या एकूण उत्पन्नातून उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतूद पुढीलप्रमाणे राहील. व्यवस्थापनासाठी २० टक्के व सामाजिक उद्दिष्टांसाठी ८० टक्के खर्चाची तरतूद राहील.

२१. कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतूद :

संस्थेस कायदेशीर मार्गाने कर्ज घेता येईल. मात्र त्यापूर्वी मुं. सा. वि. १९५० चे कलम ३५ व ३६ प्रमाणे मे. धर्मादाय सह-आयुक्त पुणे यांची रीतसर परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच ठेवी अथवा बिनव्याजी ठेवी स्वीकारता येतील.

२२. स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणेबाबतची तरतूद :

संस्थेस योग्य वाटल्यास मिळकत खरेदी करता येईल, मात्र स्थावर मिळकतीची विक्री करायची असल्यास अथवा गहाण, तबदिल करायची असल्यास मुं. सा. वि. १९५० चे कलम ३६ अन्वये मे. धर्मादाय सह-आयुक्त पुणे यांची रीतसर परवानगी घेणे आवश्यक आहे.

२३. बँक खाते :

संस्थेच्या कारभाराचे दैनंदिन हिशोब, व्यवहार बँकेमार्फत केला जाईल. तेंव्हा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत संस्थेच्या नावे खाते उघडून बँकेमध्ये संस्थेच्या ठेवी, वर्गणी, देणगी ई... रकमा ठेवून त्या काढण्याचा अधिकार फक्त अध्यक्ष, सचिव, खजिनदार या तिघांपैकी दोघांच्या सहीने करण्याचा आहे.

२४. सभासदांची यादी ठेवण्याची पद्धत :

सन १९७१ च्या संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियमांमध्ये उल्लेख केलेली अनुसूची १, ६ चे स्वतंत्र नमुने अर्जदाराचे सहीनीशी असावे त्याबाबत नियमावलीची तरतूद केलेली असावी. सभासदांची यादी १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १५ प्रमाणे जे संस्थेचे सभासद असतील त्यांची एक यादी १९७१ च्या संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियमावलीतील नियम क्र. १५ अन्वये अनुसूची ६ चे नियमात ठेवण्यात येईल.

२५. नियम व नियमावलीतील बदल करण्याची तरतूद :

कार्यकारी मंडळाने अगर सभासदांनी चालू नियम व नियमावलीमध्ये दुरुस्ती सुचवली असेल तर वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या तीनपंचमांश बहुमताने मंजूर करण्यात येईल. मात्र घटना दुरुस्ती मसुदा प्रत्येक सभासदाला नोटीसी बरोबर पाठविला जाईल.

२६. संस्थेच्या नावात किंवा उद्देशात बदल करण्याची तरतूद :

संस्थेच्या नावात किंवा उद्देशात बदल, वाढ, घट, विस्तार अथवा काही बदल करावयाचा असल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १२ व १२ अ मध्ये असलेल्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही करता येईल. वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेच्या एकूण सभासद संखेच्या तीनपंचमांश गणसंख्येने तसा ठराव संमत करावा लागेल.

२७. संस्थेची अपरिवर्तनीयता :

"सावित्रीबाई फुले पुणे यूनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन" ही संस्था अपरिवर्तनीय असेल.

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| सतीश परदेशी | दीपक गरुड | राजू गच्चे |

२८. लाभार्थी :

"सावित्रीबाई फुले पुणे यूनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन" चे लाभार्थी हे सर्व सामाजिक घटक असून कोणत्याही विशिष्ट व्यक्तीचा त्यात सहभाग नसेल.

२९. विसर्जन :

जर काही कारणांमुळे संस्था बरखास्त करावयाची झाली तर वरील प्रमाणे सर्व सभासदांना १० दिवस अगोदर नोटिस देवून कळविण्यात येईल. याबाबत सुद्धा सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेच्या एकूण सभासद संख्येच्या तीनपंचमांश गणसंख्येने तसा ठराव संमत करावा लागेल. संस्थेचे देणे घेणे, आर्थिक व्यवहार पूर्ण करावे लागतील संस्थेची स्थावर, जंगम शिल्लक मालमत्ता नोंदणीकृत संस्थेस दान, देणगी म्हणून दिली जावू शकते. तसेच संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या कलम १३ व १४ नुसार कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

संस्थेचे विसर्जन झाल्यानंतर जी काही संस्थेची सर्व दायित्वे अदा केल्यानंतर शिल्लक राहिलेली मालमत्ता व निधीचे हस्तांतरण भारतीय आयकर कायदा १९६१ च्या १२ अ अन्वये नोंदणीकृत असलेल्या तसेच ज्या सार्वजनिक धर्मादाय संस्थेचे उद्देश समान असतील अशा संस्थेस येईल आणि शिल्लक राहिलेल्या मालमत्ता व निधीचे कोणत्याही परिस्थितीत सभासदांमध्ये वाटप / वितरण होणार नाही.

सर्व कायदेशीर सोपस्कार पूर्ण झाल्यावर त्याप्रमाणे संस्थेचे कार्य बंद करता येईल अथवा विसर्जित करता येईल.

SPPUTA

स्थळ : पुणे.

दिनांक :    /    /२०२४.

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| सतीश परदेशी | दीपक गरुड | राजू गच्चे |

## दाखला

प्रमाणित करण्यात येते की,

"सावित्रीबाई फुले पुणे यूनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन"

या संस्थेचे नियम व नियमावलीची, ही सत्यप्रत आहे.

SPPUTA

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| सतीश परदेशी | दीपक गरुड | राजू गच्चे |